# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**जा.क्र.कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५** **दि.२० ऑगस्ट, २०२५**

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास अकादमी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांसाठी उच्च श्रेणीतील उपकरणावर आयोजित सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी मंचावर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.पवित्रा पाटील, महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास अकादमीचे श्री. वलांजू भार्गव, प्रा. भूषण चौधरी, महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास अकादमीचे श्री सुरज बाबर आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्धाटनाच्या भाषणात प्र- कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे म्हणाले की, संशोधन उच्च प्रतीचे करण्यासाठी आंतरशाखीय संशोधन उपकरणे वापरणे आवश्यक आहे ते कसे हाताळावे यासंदर्भात मार्गदर्शन करून विस्तृत माहिती दिली. तसेच नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल माहिती देतांना विद्यापीठाने सुरू केलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

या प्रशिक्षणात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधील ४० प्राध्यापकांनी सहभाग घेतला आहे. दि. २३ ऑगस्ट पर्यंत हे प्रशिक्षण शिबीर संपन्न होणार आहे. प्रास्ताविकात प्रा. भूषण चौधरी विद्यापीठाच्या जडणघडणी संदर्भात माहिती तसेच लघुपट व अकादमीचाही लघुपट दाखवण्यात आला तर महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास अकादमी, पुणे यांच्या तर्फे श्री. सुरज बाबर यांनी अकादमीच्या उद्देश व संदर्भित कार्याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. रक्षा कांकरिया यांनी केले.

---

मा. संपादक.

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. २० :- महिलांचे हक्क, अधिकार आणि त्यांची सुरक्षा अबाधित राहावी म्हणून वेगवेगळे कायदे बनविण्यात आले आहेत. तसेच स्त्रीयांना लैंगिक छळापासून वाचविण्यासाठी काही विशेष कायदे पारित करण्यात आले असून त्याची माहिती महिलांना असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन ॲड. महेश भोकरीकर यांनी केले.

यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, सहायक लोक अभिरक्षक ॲड. शिल्पा रावेरकर, ॲड. श्रेया चौरसिया, अधिसभा सदस्य व मुलींच्या वसतिगृह अधीक्षिका प्रा. किर्ती कमळजा उपस्थित होते.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांचे हक्क व सुरक्षा या विषयावरील व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठातील अधिसभागृहात आज बुधवार दि . २० रोजी करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

ॲड. भोकरीकर यांनी महिला संदर्भातील विविध कायद्यातील तरतुदी सविस्तर पणे मांडल्या. पॉक्सो, इन कॅमेरा चौकशी, भरपाईची तरतूद, स्त्रियांचे हक्क, अत्याचाराचे खटले जलद न्यायालयात चालविणे आदी विषयावर प्रकाश टाकला.

सहायक लोक अभिरक्षक ॲड. शिल्पा रावेरकर यांनी विनामूल्य विधीसेवा, सल्ला, वकील मिळण्याबाबत तरतुदी आपल्या भाषणातून विषद करत विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत १५१०० या टोल फ्री नंबर वर संपर्क करून कायदेविषयक मोफत सल्ला मिळवू शकता अशी माहिती दिली.

अध्यक्षीय समारोप करताना कुलसचिव डॉ. विनोद पाटील म्हणाले की, समाज व्यवस्था कशी असावी जिथे महिलांवर अत्याचार होऊ नये व त्यांना न्यायालयात जाण्याची वेळ येऊ नये असे आवाहन केले. महिलांचे हक्क, अधिकार व सुरक्षा या संदर्भात उत्तम मार्गदर्शन करण्यात आले आहे. आज जे कायदे शिकायला मिळाले त्यांचा अभ्यास करावा आणि गरजू व्यक्तीला मदत करावी. तुमच्यासमोर कुणाला त्रास होत असेल तर निश्चित त्यांना मदत करा असा सल्ला देखील त्यांनी उपस्थितांना दिला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कक्षाधिकारी प्रवीण चंदनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. किर्ती कमळजा यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २० ऑगस्ट, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता